नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५० Issue - 150 | वार शनिवार दि. १८ ऑक्टोबर २०२५ Blow- Saturday Date 18 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## विखेंनी महाराष्ट्रामध्ये विखार पसरवला

### ओबीसी एल्गार मोर्चात छगन भुजबळांचा विखे पाटलांवर हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : मराठा समाज आणि आमच्या अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे पडले आहे, असे म्हणत मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली. आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलेल्यांसाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही असे भुजबळ म्हणाले. यावेळी बोलताना भुजबळ यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर देखील टीका केली. विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला अशी टीका भुजबळ यांनी केली. विखे पाटील कारण नसताना जरांगेकडे जातात. भाजपच्या लोकांना मला सांगायचे की तुमच्या लोकांना आवरा असेही भुजबळ म्हणाले.

हिशोब करा राज्यात ५४ टक्के ओबीसी,१३ टक्के दलीत, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण त्यानंतर मुस्लिम आणि जे शिल्लक राहतात तो मराठा समाज असे भुजबळ म्हणाले.

दुहेरी लढाई लढणार आहे. एक न्यायालय आणि दुसरी रस्त्यावरची लढाई असे भुजबळ म्हणाले. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथं फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत. पक्षाच काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू असे भुजबळ म्हणाले. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील



त्यांना आडवे करा असा इशारा भुजबळ यांनी दिला.

मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती

मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हा निर्णय उच्च न्यायालयानं दिला आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितलं आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही असे भुजबळ म्हणाले. भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय, ओबीसीच्या ताकतीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळं यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले.

भुजबळ यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर देखील टीका केली. नगरला आले नाहीत, पंढरपूरला आले नाहीत, बीडला आले नाहीत, कुठला दबाव तुमच्यावर आहे. तुम्ही सांगितलं होतं तुमच्याबरोबर आहे. मग तुम्ही का नाही आलात ? असा सवाल भुजबळांनी केला.

## त्यांचे टार्गेट ओबीसी नाही देवेंद्र फडणवीस आहेत : भुजबळ

बीड : ओबीसी महाएल्गार सभेत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगायचं आहे, त्यांनी सावध राहावं, ही मंडळी तुमच्या वाईटावर आहेत, असं म्हटलं. त्यांचे टार्गेट ओबीसी नाही देवेंद्र फडणवीस आहेत, असंही छगन भुजबळ म्हणाले. या ओबीसी महाएल्गार सभेला भाजप आमदार गोपीचंद पडळकर, माजी मंत्री धनंजय मुंडे, ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

छगन भुजबळ पुढे म्हणाले, मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हे हायकोर्टाचे निर्णय आहेत. अरे तुम्ही कसं काय देता. सुप्रीम कोर्टानं सुद्धा सांगितलं की मराठा सामाजिकदृष्ट्या मागास नाही, त्यांना आरक्षण देता येणार नाही. मग तुम्ही कसं काय देता. त्यावेळी मुख्यमंत्री कुठं होतं, मुख्यमंत्री नागपूरला होते, इथं यांनी निर्णय घेतला. पात्र शब्द काढून टाकला. मुख्यमंत्र्यांना मला सांगायचं आहे, सावधान, ही जी मंडळी आहेत ना तुमच्या वाईटावर आलेली आहेत. तुम्हाला अडचणी निर्माण करणारी आहेत. त्यांचं टार्गेट ओबीसी नाही, त्यांचं टार्गेट देवेंद्र फडणवीस आहेत, हे लक्षात ठेवा, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं. भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय आज तुम्हाला ओबीसीच्या ताकदीवर १२५-१३५ आमदार मिळाले आहेत. त्या ओबीसीवर अन्याय कराल तर ओबीसी आज दूधखुळे राहिलेले नाहीत. त्यामुळं यामध्ये लवकरात लवकर मार्ग काढावा लागेल, असं छगन भुजबळ यांनी भाजप नेत्यांना सांगितलं. विजय वडेट्टीवार अंबडला आले होते, त्यांनी सांगितलं पक्ष वगैरे बाजूला पिवळा झेंडा एकत्र घेऊन आपण जाणार आहोत, लढणार आहोत. हिंगोलीच्या रॅलीला बोलावलं, काय माहिती प्रेशर आलं, येतो म्हणले आलेच नाहीत. नगरला बोलावलं , पंढरपूरला बोलावलं, बीडला रॅली झाली, आलेच नाहीत. तुम्ही ओबीसी सोबत राहणार असं म्हटलं होतं का आला नाहीत, असा सवाल छगन भुजबळ (पान २ वर...)

## दाखले वाटपावरून विखे पाटलांना मराठा आंदोलकांचा घेराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : हैदराबाद गॅझेट लागू करण्याबाबत राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय (जीआर) फसवा आहे. गेल्या दीड महिन्यात कोणतीही प्रशासकीय प्रक्रिया झाली नाही, असा आरोप करत मराठा आंदोलकांनी शुक्रवारी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण पाटील यांना घेराव घातला. कुणबी प्रमाणपत्र काढण्यातील त्रुटी दूर करण्याचं आश्वासन यावेळी विखे यांनी आंदोलकांना दिलं आहे.




मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळात ८८ व्या नियामक मंडळाच्या बैठकीसाठी छत्रपती संभाजीनगर शहरात आले होते. विखे पाटील थांबलेल्या खासगी हॉटेलजवळ त्यांना मराठा आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. पैठण येथील विदूर लगडे यांच्या नेतृत्वात आंदोलकांनी विखे यांना अडवत मराठा आरक्षणाचे काय झाले, अशी विचारणा केली. २ सप्टेंबरच्या जीआरमधून समाजाला काय मिळाले ? असा सवाल करत कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी ग्रामसमिती स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. अंतरवाली सराटी गावातसुद्धा ग्रामसमिती स्थापन नाही. जीआर काढून दीड महिना उलटलेला असूनही प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू नाही, असा आरोप आंदोलकांनी केला.

तुमच्या भावनांशी सहमत आहे. यंत्रणेत त्रुटी दिसत आहेत. पण, जीआर फसवा नाही. त्रुटी दूर करण्यासाठी ऑनलाइन बैठक बोलावली आहे. सरकार म्हणून भूमिका घेतलेली आहे. काही जण प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मराठा आरक्षणाची अंमलबजावणी नक्की होईल. कुणीही गैरसमज बाळगू नये, असे विखे म्हणाले. त्यानंतर राधाकृष्ण विखे राहुरी येथे रवाना झाले.

दरम्यान, विखे पाटील यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. २ सप्टेंबर रोजीचा मराठा आरक्षणाचा जीआर फसवा आहे, असं सांगत आंदोलकांनी हॉटेल परिसरात जीआर फाडत निषेध नोंदवला.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी ओबीसी मेळाव्यावर भाष्य करणं टाळलं. मराठा आरक्षणाबाबत न्यायालयात दावे दाखल आहेत. सरकार न्यायालयात भूमिका मांडणार आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, ही भूमिका कायम आहे. छगन भुजबळ ज्येष्ठ नेते आहेत, त्यांच्याशी चर्चा करू, असं विखे म्हणाले.

## आईने 'यकृत' देऊन वाचविले मुलीचे प्राण; मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून 'आर्थिक आधार'

मुंबई : सात वर्षांची देवांशी गेल्या अनेक महिन्यांपासून यकृताच्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. डॉक्टरांनी अखेर 'यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया' हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले. तसेच उपचारासाठी २० लाख रूपये खर्च येणार असल्याचे सांगितले. मात्र, भाजीपाला विक्रीचा छोटा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबापुढे या उपचाराचा खर्च परवडणारा नव्हता. या कठीण काळात 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष'चा कुटूंबीयांना आर्थिक आधार मिळाला. तसेच देवांशीच्या आईने तिला यकृत दिल्यानंतर तिच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले.

वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील वरूड (बु) येथे राहणारे रवींद्र गावंडे हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मागील अनेक दिवसांपासून त्यांची मुलगी देवांशी पोटदुखी, ताप, मळमळ होणे आदींमुळे सतत आजारी पडत होती. पालकांनी सुरूवातीला मंगरूळपीर आणि अकोला येथे तिच्यावर उपचार केले. परंतु तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने अखेर तिला नागपूर येथे हलविण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर, तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया' गरजेचे असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी २० लाख रुपये खर्चाचा अंदाज त्यांनी वर्तविला होता.

दरम्यान, देवांशीच्या वडिलांना मित्रांकडून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळाली. त्यांनी कक्षाकडे धाव घेतली. त्यासोबतच समाज माध्यमावर मदतीकरिता आवाहन केले. कक्षाच्या पुढाकाराने देवांशीवर




पुढील उपचार मुंबईतील वाडिया हॉस्पिटलमध्ये सुरू झाले. या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, टाटा ट्रस्टच्या माध्यमातून उपचाराची मोठी रक्कम उभी राहिली. उर्वरित रक्कम इतर काही सामाजिक संस्था आणि गावकऱ्यांच्या वर्गणीतून गोळा करण्यात आली. देवांशीची आई मीनाक्षी गावंडे यांनी यकृत दिले. तिच्यावर ७ जुलै २०२५ रोजी यकृत प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली.

देवांशीची प्रकृती आता स्थिर असून तिच्या प्रकृतीत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. आता तिला डिस्चार्ज मिळाला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आणि टाटा ट्रस्टच्या मदतीमुळेच आमच्या मुलीचे प्राण वाचले, असे देवांशीचे वडील रवींद्र गावंडे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार प्रत्येक गरजू, गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी कक्षाच्या माध्यमातून आम्ही प्रयत्न करत आहोत. देवांशी त्याचे एक उदाहरण आहे. आम्ही वेळेवर मदत करू शकलो याचा आम्हाला आनंद आणि समाधान आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

**ओझर येथील कार्यक्रमात तेजससह प्रशिक्षणार्थी विमान राष्ट्राला समर्पित**

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन**

## आत्मनिर्भर आणि बलशाली भारतासाठी हिंदुस्थान एरॉनॉटिक्सची भूमिका महत्त्वाची

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : नाशिकची भूमी अध्यात्मिकतेबरोबरच आत्मनिर्भरतेचे प्रतिक असून देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत आत्मनिर्भर होऊन बलशाली होण्यासाठी या भूमीतील हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) या प्रकल्पाची महत्त्वाची भूमिका आहे, असे प्रतिपादन देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले.

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या ओझर (नाशिक) येथील प्रकल्पात एलसीए एमके १एची (तेजस) तिसरी उत्पादन साखळी आणि एचटीटी ४० या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचा शुभारंभ आज सकाळी संरक्षण मंत्री श्री. सिंह यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, एचएएलचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. डी. के. सुनील, संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीवकुमार आदी उपस्थित होते.

संरक्षण मंत्री श्री. सिंह म्हणाले की, एचएएलच्या ओझर प्रकल्पात मिग, सुखोई ३०, तेजस आणि प्रशिक्षणार्थी विमानांची निर्मिती होऊन त्यांनी अवकाशात घेतलेले उड्डाण हे देश आणि संरक्षण विभागासाठी अभिमानाची बाब आहे. हे केवळ गौरवाचे उड्डाण नसून आत्मनिर्भर भारताचे उड्डाण आहे. गेल्या सहा दशकांपासून कार्यान्वित एचएएल संरक्षण उत्पादनांसाठी महत्वाचे आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत देशाला संरक्षण उत्पादनांबाबत परकीय देशांवर अवलंबून राहावे लागत असे. ६५ ते ७० टक्के साहित्य आयात केले जात असे. आता या परिस्थितीत बदल होत आहे. आता ६५ टक्के साहित्य देशातच तयार होत आहे. लवकरच सर्व साहित्य देशांतर्गत तयार करण्यात येईल. एचएएलने विविध संस्थांच्या सहकार्याने उत्पादित केलेले लढाऊ विमाने ही देशासाठी गौरवाची बाब आहे. देशाचे हवाई दल नवीन तंत्रज्ञानाच्या विमानांमुळे अधिक मजबूत होईल.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश संरक्षण साहित्य उत्पादनात स्वयंपूर्ण आणि सक्षम होत आहे. त्यामुळे आयातीवरील अवलंबित्व कमी झाले. देशांतर्गत संरक्षण उत्पादनांचे मूल्य २०२९ पर्यंत तीन लाख कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे देशाचे आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. तसेच संरक्षण उत्पादनांचे निर्यात मूल्य सन २०२९ पर्यंत दुप्पट म्हणजे ५० हजार कोटी रुपयांपर्यंत करण्याचे ध्येय आहे. ते निश्चितपणे साध्य केले जाईल. गेल्या १० वर्षांत भारताने गतीने संरक्षण उत्पादन क्षेत्रात प्रगती केली आहे. त्यामुळे लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे, यंत्र, लढण्यासाठी आवश्यक इलेक्ट्रॉनिक साधनांची निर्मिती भारतातच होत आहे. मेक इन इंडियांतर्गत स्थानिक उत्पादकांना प्रेरणा देण्याचे काम सुरू आहे. त्याचाही लाभ होत आहे. यामुळे स्थानिक उद्योजकांनाही पाठबळ मिळत आहे.

सध्या युद्धनीतीत बदल होत आहेत. वेगवेगळ्या पातळ्यांवर लढाया लढल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर, ड्रोन सिस्टिम आणि नेक्स्ट जनरेशनमधील विमाने भविष्यातील लढायांची दिशा निश्चित करतील. एचएएलमध्ये निर्मित मिग २१ विमानांची देशांच्या सीमांचे संरक्षण केले. त्यात एचएएलचे योगदान उल्लेखनीय आहे, असे सांगत त्यांनी अलिकडेच राबविण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या वेळेस एचएएलने पूर्ण क्षमतेने काम केले. या काळात त्यांनी २४ तास सेवा बजावली, असे सांगत एचएएलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मंत्री श्री. सिंह यांनी कौतुक केले. तसेच एचएएलने खासगी क्षेत्राच्या सहकार्याने जागतिक पातळीवर दर्जेदार उत्पादनांची निर्मिती करीत आहे. हा परिसर डिजिटल आणि पेपरलेस आणि परिपूर्ण शाश्वत झाला आहे, असा मला विश्वास आहे, असे सांगत त्यांनी एचएएलने स्वीकारलेल्या नवतंत्रज्ञान व गुणवत्तेचे कौतुक केले. तेजस आणि प्रशिक्षणार्थी विमानाच्या निर्मितीमुळे परिसरातील अनेकांना रोजगाराची उपलब्धता झाली आहे. तसेच आगामी काळात नागरी आणि सैन्य दलाच्या विमानांची दुरुस्ती, व्यवस्थापन आणि ओव्हरऑलची सुविधा यामुळे या दोन्ही क्षेत्रात भारताची विकासाकडे वाटचाल सुरू झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.

संरक्षण सचिव संजीवकुमार, एचएएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुनील यांनी मनोगत व्यक्त करताना एचएएलच्या माध्यमातून देशसेवेत बजावण्यात येणाऱ्या कामगिरीची माहिती देत आगामी काळात ही सेवा अखंडपणे सुरूच राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी वैमानिक के. के. वेणुगोपाल, प्रत्युष अवस्थी यांनी तेजस आणि एचटीटी ४० या विमानांच्या थरारक कसरती सादर करीत संरक्षण मंत्री श्री. सिंग यांना सलामी दिली. हिंदुस्थान एरॉनॉटिकल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी साकेत चतुर्वेदी यांनी आभार मानले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह सैन्य दल, वायू दलातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन व एचएएलचे वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी, विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

### सहाय्यता निधीचा आधार

सात वर्षांची देवांशी गेल्या अनेक महिन्यांपासून यकृताच्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. डॉक्टरांनी अखेर 'यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया' हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले. तसेच उपचारासाठी २० लाख रूपये खर्च येणार असल्याचे सांगितले. मात्र, भाजीपाला विक्रीचा छोटा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबापुढे या उपचाराचा खर्च परवडणारा नव्हता. या कठीण काळात 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष'चा कुटूंबीयांना आर्थिक आधार मिळाला. तसेच देवांशीच्या आईने तिला यकृत दिल्यानंतर तिच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले. वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील वरूड (बु) येथे राहणारे रवींद्र गावंडे हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मागील अनेक दिवसांपासून त्यांची मुलगी देवांशी पोटदुखी, ताप, मळमळ होणे आदींमुळे सतत आजारी पडत होती. पालकांनी सुरूवातीला मंगरूळपीर आणि अकोला येथे तिच्यावर उपचार केले. परंतु तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने अखेर तिला नागपूर येथे हलविण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर, तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया' गरजेचे असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी २० लाख रुपये खर्चाचा अंदाज त्यांनी वर्तविला होता. दरम्यान, देवांशीच्या वडिलांना मित्रांकडून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळाली. त्यांनी कक्षाकडे धाव घेतली. त्यासोबतच समाज माध्यमावर मदतीकरिता आवाहन केले. कक्षाच्या पुढाकाराने देवांशीवर पुढील उपचार मुंबईतील वाडिया हॉस्पिटलमध्ये सुरू झाले. या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, टाटा ट्रस्टच्या माध्यमातून उपचाराची मोठी रक्कम उभी राहिली. उर्वरित रक्कम इतर काही सामाजिक संस्था आणि गावकऱ्यांच्या वर्गणीतून गोळा करण्यात आली. देवांशीची आई मीनाक्षी गावंडे यांनी यकृत दिले. तिच्यावर ७ जुलै २०२५ रोजी यकृत प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली.

## त्यांचे टार्गेट ओबीसी नाही ....

(पान १ वरून..) यांनी केला. यावेळी भुजबळ यांनी विजय वडेट्टीवारांचा एक व्हिडिओ दाखवला. ज्यामध्ये मराठवाड्यातील मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्या असं सांगत असल्याचं पाहायला मिळतं. यावर छगन भुजबळ यांनी वडेट्टीवार यांना एकच भूमिका घ्या असं सांगितलं. तासा तासाला तुम्ही जर बदलायला लागला तर ओबीसी समाजाचा घात होईल, असं छगन भुजबळ म्हणाले. आम्ही पक्षासाठी काम करत नाही, आम्ही ओबीसीसाठी काम करतो. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो गेलो नाही, असं देखील भुजबळ म्हणाले.

# 'बाबासाहेब आंबेडकर, नावं हे गाजतय हो, जगभर' या अजरामर गाण्याचे महाकवी हरेंद्र जाधव


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एक, एक शब्द वेचून गाण्याची माळ गुंफून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची, प्रबोधनाची साज जुळविणारे, आपल्या लेखणीतून, गाण्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा उभी करणारे दहा हजाराहून अधिक गाणी लिहिणारे, ६० वर्षाहून अधिकचा काळ हा कलेच्या माध्यमातून समाजप्रबोधनासाठी खर्च करणारे मुख्याध्यापक, जलसाकार, शाहीर, कवी, गीतकार, आंबेडकरी चळवळीत सक्रिय सहभाग, समाजसेवक, लोकनाट्यकार, कथा लेखक, महाराष्ट्राच्या साहित्य, सांस्कृतिक, शैक्षिणक आणि सामाजिक क्षेत्रात खारीचा वाटा असणारी व्यक्तिमत्त्व प्रतिभावंत प्रसिद्ध लोककवी म्हणजेच कवी हरेंद्र हिरामण जाधव...

अनेक गाणी आपण ऐकली असतील. त्यातील 'पहा पहा मंजुळा, हा माझ्या भिमरायाचा मळा' हे गाणं हरेंद्र जाधव यांनी लिहून बाबासाहेबांनी आपल्याला एक मळा निर्माण करून दिला आणि त्या मळ्यात आपण सर्वजण आज समतेचा नातं जोडून राहत आहोत. अशा छान गाण्यातून हरेंद्र जाधव यांनी आंबेडकरी चळवळीशी आपली नाळ घट्ट जोडली आहे. 'हे खरंच आहे खरं, की भीमराव रामजी आंबेडकर, बाबासाहेब आंबेडकर, नाव हे गाजतंय हो जगभर, जेव्हा जेव्हा ही गाणी ओठावर येतात तेव्हा मन भारावून जातं. मन प्रसन्न होतं. दीक्षा आम्हा दिली भीमाने, मंगल दिन तो जनी हे गाणं ऐकताच १४ ऑक्टबर १९५६ साली नागपूरच्या दीक्षाभूमीवरती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रक्ताचा एकही थेंब न सांडवता धर्मांतर करून 'न भूतो ना भविष्यति' अशी अद्भुत क्रांती घडवून आणली. त्या दिवसाची आठवण या गाण्यातून होते आणि एका क्षणात असं वाटतं की, गाण्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर उभी राहिली आहे. एवढी ताकत ज्येष्ठ कवी हरेंद्र जाधव यांच्या लेखणीत होती.

१६ फेब्रुवारी १९३३ रोजी नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील मिग ओझर गावात हरेंद्र जाधव यांचा जन्म झाला. आंबेडकरी चळवळीच्या आणि गाण्याच्या साहित्यिक ध्येयापोटी हरेंद्र जाधव मुंबईत आले. मिग ओझर या गावाची ओळख आज आंबेडकरी चळवळीतील एक ऐतिहासिक गावं म्हणून ओळखली जाते. मुंबई महापालिकेच्या विविध शाळांमध्ये हरेंद्र जाधव यांनी ३३ वर्षे शिक्षक म्हणून काम केले. सेवेतील शेवटची काही वर्षे ते मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. पुढे मुख्याध्यापक पदावरून १९९२ साली निवृत्त झाले.

शिक्षक हा समाजाचा आरसा असतो हे ज्येष्ठ कवी हरेंद्र जाधव यांनी दाखवून दिले आणि आंबेडकरी चळवळीचा ते भाग बनले. १९८८ पर्यंत जवळ जवळ पंधरा वर्ष हरेंद्र जाधव ट्रॉम्बे कोळीवाडा या महानगरपालिकेच्या शाळेत कार्यरत होते. शाहीर वामनदादा कर्डक यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. त्या स्नेहातूनच नाशिकमध्ये स्थापन झालेल्या 'महाकवी वामनदादा कर्डक' प्रतिष्ठानाशी त्यांचे अतूट नाते होते. जाधवांनी १९५० च्या सुमारास वयाच्या १७ व्या वर्षापासून आपल्या गीतलेखनाला सुरुवात केली. १९५८ ते २०२१ पर्यंत एकूण ६३ वर्ष ते मुंबईत वास्तवास होते. जी सुरुवात त्यांनी लिहायला केली ते शेवटच्या श्वासापर्यंत लिहत होते. विशेष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एका सभेतच आपले पहिले गीत लिहिले



आणि त्यांच्यासमोरच गाणी सादर करणारे व्यक्ती म्हणजे हरेंद्र जाधव...

१९५० साली नाशिकला गंगातीरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मोठी सभा होती. त्या सभेत १९५० साली 'बाबांची मोटार आली, गर्दी ही हटवा' हे पहिले भीमगीतं लिहिले. जाधव यांनी गीत लिहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल असलेली आत्मीयता दाखवली आणि आपल्या लेखणीतून लोकांच्या मनावर राज्य केले. त्याचबरोबर 'पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा, हे खरंच आहे खरं श्री भीमराव रामजी आंबेडकर, बाबासाहेब आंबेडकर कर नाव हे गाजतंय हो जगभर' ही गाणे जगभर प्रसिद्ध झाली. भीम जयंतीला ही गाणी वाजल्याशिवाय भीमजयंती पूर्ण होतच नाही अशी ही अजरामर ठरलेली त्यांची गीते.

शाहीर कृष्णा शिंदे, शाहीर साबळे, प्रल्हाद शिंदे, विठ्ठल उमप, सुरेश वाडकर, रंजना शिंदे, श्रावण यशवंते, विठ्ठल भेडे, अजित कडकडे, आनंद शिंदे, रोशन सातारकर, सुलोचना चव्हाण, अनुराधा पौडवाल, साधना सरगम, उत्तरा केळकर, वैशाली सामंत, शकुंतला जाधव, किसन खरात, दत्ता जाधव, बेला सुलाखे अशा अनेक नामवंत गायक, संगीतकारांनी त्यांच्या गीतांना स्वरसाज चढवला. त्यांच्या गीतांवर पोवाडे, लोकनाट्याच्या ध्वनिमुद्रिका, ध्वनिफिती आज अजरामर आहेत. त्यांच्या लेखणीचा डंका सर्वजगी गाजतो आहे.

१९७२ साली 'आता तरी देवा मला पावशील का सुख ज्याला म्हणतात ते दावशील का' या गाण्याने त्यांनी लोकप्रियता मिळवली. 'माझ्या नव्यानं सोडलिया दारू' हे लोकगीत कमालीचे लोकप्रिय ठरले. ह्यिा मोत्याच बाशिंग बांधा नवरीला, माझ्या लग्नाचा बँड बाजा वाजतो, ही गाणी लगीन सराईत प्रत्येक लग्नात मोठ्या प्रमाणात वाजवली जातात. भीमगीते : 'पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा', 'बाबासाहेब आंबेडकर, नावं हे गाजतय हो ,जगभर', चाललीस रमा तू मला सोडूनी, 'भीमरायानं समतेचा झेंडा जगी रोविला' दिसते कोणाची गाडी हिरव्या रंगाची जोडी जा गं सयांनो कुणी पाहून या हे जयंती दिना ही तुला प्रार्थना होऊ हे या दिनी भीम जन्म, बुद्ध विहारा, पुन्हा रमाबाई पत्र लिहते, भक्तीगीते : 'तूच सुखकर्ता, तूच दुःखहर्ता', 'आता तरी देवा मला पावशील का', 'मंगळवेढे भूमी संतांची', लोकगीते : आगरान गेलू बाय डोंगरानं गेलू गो, पायानं काटा माझे भरलान गो, 'माझ्या नव्यानं सोडलिया दारू', 'देवा मला का दिली बायको अशी, महागाईचा काळ असा, घेतलंय मनावर, दुनिया सारी सोड परी आई बाप हे सोडू नको लग्नगीते : ह्यिा मोत्याच बाशिंग बांधा नवरीला, माझ्या लग्नाचा बँड बाजा वाजतो. लग्नाच्या रेशमी गाठी तर विशेष म्हणजे भक्तिगीते, भावगीते, भीमगीते, कोळीगीते, लग्नगीते, लावण्या, पोवाडे, लोकनाटय, कथा असे चौफर लिखाण लोककवी हरेंद्र जाधव यांनी केले आहे. गाण्याचा जलसा संपल्यावर कलाकारांचा एक नारळ आणि सव्वा रुपया देऊन गावातील लोक सत्कार करीत असत आणि तेच मानधन लाख मोलाच ठरलं आहे. त्यांच्या ६०० हून अधिक ध्वनिफिती लोकार्पित झाल्या आहेत. तर नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.

जाधवांची कन्या तारका जाधव आणि राजा कांदळकर, शरद शेजवळ यांच्या पुढाकाराने 'लोककवी हरेंद्र जाधव साहित्य संस्था' स्थापन केली. या संस्थेर्मार्फत 'गीत भीमायन', 'गीत रमायण' आणि 'संसार माझा आंबेडकरी' हे गीतसंग्रह प्रकाशित केले. त्या साहित्यातून समाजाचे प्रबोधन कसे होईल याकडे त्यांची कन्या कवयित्री तारका हरेंद्र जाधव लक्ष देणार आहे. असे त्यांनी माझ्याशी बोलताना सांगितले.त्यातून अनेक गाण्यातून प्रबोधनाची मशाल तैवत ठेवण्याच कामं कलाकारांचं सुरू आहे. महान कलाकाराने साहित्यातून एवढी सेवा दिली, मात्र सरकार दरबारी कोणतेही दखल अशा महान कलाकाराची घेतली गेली नाही अशी खंत त्यांची कन्या तारका जाधव, कुटुंबीयांनी आणि चाहत्यांनी व्यक्ती केली आहे.

२४ एप्रिल २०२१ मध्ये वयाचा ८८ वर्षी नवी मुंबईत सानपाडा येथे अखेरचा श्वास त्यांनी घेतला. परिवर्तनाच्या चळवळीत त्यांचे विशेष योगदान आहे. आज ते आपल्यात नसले तरी मात्र त्यांनी गाणी लिहिलेली अजरामर गीते आजही आपल्याला त्यांची आठवण करून देतात. निधनाने आंबेडकरी, सांस्कृतिक चळवळीची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या लेखणीतून निर्माण झालेल्या साहित्याचा प्रसार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ अधिक गतिमान करू या...

**लेखक – कवी , पत्रकार मिलिंद जाधव, पडघा भिवंडी मो.८६५५५६९४३६**

# 'भारतरत्न' सन्मानित व्यक्तिमत्त्वांच्या अर्धपुतळ्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



रत्नागिरी/जिमाका) :: रत्नागिरी नगरपरिषद महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत कोकण विभागातील भारतरत्न सन्मानित महर्षी धोंडू केशव कर्वे, पांडूरंग वामन काणे, विनोबा भावे, डॉ. भीमराव आंबेडकर, लता मंगेशकर, सचिन तेंडूलकर यांच्या अर्धपुतळ्यांचे लोकार्पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले.

याप्रसंगी पालकमंत्री डॉ. उदय सामंत, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, आमदार किरण सामंत, आमदार दीपक केसरकर, जिल्हाधिकारी मनुज जिंदल, मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे, पोलीस अधीक्षक नितीन बगाटे, माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी आमदार रविंद्र फाटक आदी उपस्थित होते.

नगरपरिषदेच्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे तारांगण प्रांगणात जे जे स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांकडून वाहनांच्या सुट्ट्या भागांचा वापर करुन हे पुतळे तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक पुतळा ४ टनाचा आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी ९ महिने परिश्रम घेतले आहेत. प्रत्येक पुतळ्यासमोर त्यांच्या कार्याची माहिती मराठी आणि इंग्रजीमधून देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कोनशिलेचा अनावरण करुन आणि कळ दाबून या पुतळ्यांचे लोकार्पण केले. जे जे स्कूल ऑफ ऑर्टचे शिक्षक शशिकांत काकडे, विजय बोंदर, विद्यार्थी विजय पाटील यांचा उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# कुक्कुटपालन प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण व जागतिक अंडी दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत सघन कुक्कुट विकास गट, सोलापूर येथे कुक्कुटपालन प्रशिक्षण तुकडी क्र. ३ चा प्रमाणपत्र वितरण समारंभ जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (प्रभारी) डॉ. व्हि. डी. येवले यांच्या हस्ते संपन्न झाला. जागतिक अंडी दिनानिमित्त प्रशिक्षणार्थींना उकडलेली अंडी वाटप करून अंड्याच्या पोषणमूल्यांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात डॉ. स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी गट-अ यांनी प्रशिक्षणाची यशोगाथा विषद करत अंड्याच्या दैनंदिन आहारातील महत्त्वावर प्रकाश टाकला. शालेय विद्यार्थी व नागरीकांनी अंड्याचा आहारात समावेश करून आरोग्यरक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी एस. पी. माने यांनी केले.

प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना डॉ. येवले यांनी कुक्कुटपालन व्यवसाय हा नगदी उत्पन्न देणारा शेतीपूरक जोडधंदा असल्याचे सांगून, प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा वापर प्रत्यक्ष कृतीत करून प्राणीजन्य पदार्थांच्या उत्पादनातील तुट भरून काढण्याची संधी असल्याचे नमूद केले.

प्रशिक्षणार्थी श्री. सूर्यभान सावंत यांनी प्रशिक्षणामुळे स्वयंरोजगार व लघुउद्योग उभारणीस पूरक माहिती मिळाल्याबद्दल आभार व्यक्त केले. प्रशिक्षण तुकडी दि. ६ ते १० ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपन्न झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. जमादार, श्री. संताजी देशमुख व श्री. प्रशांत निकंबे यांनी विशेष परिश्रम घेतले.

पुढील तुकडीसाठी जिल्ह्यातील पशुपालक व सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी नोंदणी करून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी केले.

# सोलापूरमध्ये जागतिक अंडी दिन उत्साहात साजरा; हजार अंड्यांचे वाटप, पोषणाचे संदेश



सोलापूर,/जिमाका : जागतिक अंडी दिनानिमित्त सोलापूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या सघन कुक्कुट विकास गटाच्या वतीने विविध शाळा व अंगणवाड्यांमध्ये अंड्याचे पोषणमूल्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. नेहरू नगर, लष्कर व राज्य राखीव पोलीस दल गट क्र. १० येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाड्यांमध्ये प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांना सुमारे १ हजार उकडलेली अंडी वाटप करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (प्रभारी) डॉ. व्हि. डी. येवले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी गट-अ यांनी अंड्याच्या पोषणतत्वांबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी व नागरीकांनी दैनंदिन आहारात अंड्याचा समावेश करून आरोग्यरक्षण करावे, असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे डॉ. भोसले शिवाजी (खाजगी पोल्ट्री सल्लागार, सोलापूर) यांनी अंडी हे भेसळमुक्त व शाकाहारी असून, नियमित सेवनामुळे कर्करोगासारख्या आजारांवर मात करता येते, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी अंड्यांचे प्रयोजन श्री. प्रसाद कृष्णाजी भगत (भैरवनाथ हायटेक अग्रो प्रा. लि., मुस्ती) व श्री. वेकंटराव (बालाजी पोल्ट्री फार्म, बाणेगाव) यांनी केले. शाळांचे मुख्याध्यापक श्री. थोरबोले, श्रीमती ज्ञानेश्वरी संगीतकर व श्री. पुंडलिक कलखांवकर यांच्यासह शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

हा उपक्रम अंड्याच्या पोषणमूल्याविषयी जनजागृती करताना कुक्कुटपालन व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कृतीचा अनुभव देणारा ठरला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंचाहत्तरीनिमित्त एसटीचा अनोखा उपक्रम!

**७५ बसस्थानकांवर मोफत वाचन कट्टा : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताचे लोकप्रिय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक आगळा-वेगळा, लोकाभिमुख आणि संस्कारमूल्ये जपणारा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील प्रमुख ७५ एसटी बसस्थानकांवर मोफत वाचनालय उभारून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा दिवा जनतेसाठी प्रज्वलित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या ३०९ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निर्णयाची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, तसेच उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे आणि ज्येष्ठ नेते विनय सहस्रबुद्धे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आकाराला आला आहे. मोदीजींच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्वसामान्य नागरिकांसाठी 'मोफत खुले वाचनालय' उभारण्यात येणार आहे.

**मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरी निमित्त आम्ही जनतेसाठी ज्ञानाची ही 'अनमोल भेट' देत आहोत. वाचन संस्कृती आणि मराठी साहित्याचा प्रचार हा आमचा लोकाभिमुख उपक्रम आहे.**
**– प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

या वाचनालयांमध्ये वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, व.पु. काळे, विश्वास पाटील अशा नामवंत साहित्यिकांच्या कृती उपलब्ध असतील. तसेच एमपीएससी व यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठेवण्यात येणार आहेत.



हा 'वाचन कट्टा' मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपणारा ठरेल आणि समाजात वाचन संस्कृतीचा नवा सुवर्णप्रकाश पसरवेल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दीपावली २०२५: वसुबारस निमित्त श्री विठ्ठलास व रूक्मिणी मातेस अलंकार परिधान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वसुबारस पासून दीपावली महोत्सवास सुरवात झाली आहे. या निमित्त पोशाखावेळी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे वसुबारस पासून ते दिवाळी पाडवा पर्यन्त श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात येणार आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, हिऱ्याचा कंगण जोड, दंडपेट्या जोड मोठा, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी २ पदरी, मारवाडी पेट्याचा मोत्याचा हार, शिरपेच मोठा १० लोलक असलेला, मस्त्य जोड, तोडे जोड इत्यादि अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तारवाड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादि पारंपारिक अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच दिपावलीत वसुबारस, दिवाळी पाडवा, नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तुकाराम भवन, श्री.ज्ञानेश्वर दर्शन मंडप व भक्त निवास इत्यादि ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे तसेच संपूर्ण विठ्ठल मंदिर आणि मंदिर परिसरात मोठ्या संख्येने पणत्या लावून दीपोत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.



# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर संचालित गोशाळेत वसुबारस साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर यांच्या वतीने संचालित गोशाळा परिसरात आज वसुबारस सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही वसुबारस निमित्त गोमातेची विधिवत पूजा, आरती, पुष्पहार अर्पण व नैवेद्य अर्पण अशा पारंपारिक पद्धतीने कार्यक्रम पार पडला. गोशाळेतील सर्व गाईंची स्वच्छता, सजावट तसेच परिसर सुशोभित करण्यात आला होता. भाविकांसाठी दर्शनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

वसुबारस हा दीपावलीतील पहिला दिवस असून गोमातेच्या पूजनाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने गोसेवा, संवर्धन आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या वेळी समिती सदस्य जळगावकर महाराज, नडगिरे ताई, तसेच समितीचे अधिकारी, कर्मचारी व अनेक भाविक उपस्थित होते.

# चिखली येथे वंचितची आगामी निवडणुका संदर्भात महत्वाची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्याच्या वतीने होऊ घातलेल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकी संदर्भात शासकीय विश्रामगृह चिखली येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.सदर बैठकीमध्ये पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार स्थानिक लेव्हलवर भाजप मित्र पक्ष सोडून इतर कोणत्याही पक्षांसोबत सन्मानपूर्वक युती करण्यास तयार आहे.चिखली तालुक्यातील वंचित बहुजन आघाडी चिखली तालुक्यामध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका लढण्यास वंचित बहुजन आघाडी स्वबळावर



सक्षम आहे. इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी सुद्धा मागितली आहे. सदर बैठकीत महत्वाचे मुद्यावर चर्चा करण्यात आली. चिखली शहरातील प्रत्येक प्रभागात वंचित बहुजन आघाडी कडून उमेदवार रिंगणात उतरणार आहे. व प्रत्येक जि. प. पं. स.सर्कलमध्ये सुद्धा उमेदवार रिंगणात उतरणार आहे.या बैठकीमध्ये अनेक महत्वाच्या मुद्यावर चर्चा करण्यात आली यावेळी ता अध्यक्ष .संजय धुरंधर.उपाध्यक्ष शिवाजी गाडे. शहराध्यक्ष बाळू भिसे अँड. सतीश भाऊ गवई. ता. सं.प्रा. प्रवीण खरात. ता. सचिव. जितु निकाळजे ता. उ.अक्षय जाधव ता. जिल्हा सदस्य.विद्याधर गवई मनोहर भाऊ घेंवदे. ता. उ. मा. वासुदेव वानखडे ज्येष्ठ नेते.मा. गजानन भाऊ धुरंधर ज्येष्ठ नेते. मा.रमेश भाऊ गवई ता. उ. अँड .विजय वानखडे.सौ. मालतताई निकाळजे ज्येष्ठ नेत्या. राजेश खंडारे. निलेश सुभाष जाधव .रोहित पेंढारकर. .मुकुंदा भाऊ खरात.गुलाबराव साळवे. आकाश महाजन .गौतम साळवे मा. व्ही .पी. पवार साहेब इतर सर्व वंचित बहुजन आघाडी चिखलीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# संदेश विद्यालयाच्या वेदांत शेलारचे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**राज्य पातळीवर कांस्यपदकाची कमाई**

विक्रोळी/केतन भोज : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने नेवासा (जिल्हा - अहिल्यानगर) येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२५ - २६ मध्ये विक्रोळीच्या संदेश विद्यालयाने उत्तुंग कामगिरी नोंदवली आहे.

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) येथील संदेश विद्यालय एण्ड ज्युनियर कॉलेजचा विद्यार्थी वेदांत विनोद शेलार (इ.१२ वी) याने १९ वर्षाखालील मुलांच्या फ्री स्टाईल ८६ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक पटकावले. या उत्कृष्ट यशामुळे विद्यालयाचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल झाले आहे. वेदांतच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे, संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे आणि शाळेच्या प्राचार्य मेघा म्हात्रे यांनी त्याचे अभिनंदन केले असून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# म.बसवेश्वर आयटीआयच्या प्राचार्यपदी मनोज बिडकर सुरेश भालचीम यांची पुण्याला बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: सोलापूरच्या विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्र.प्राचार्यपदी श्री.मनोजजी बिडकर यांची बदली झाली असून त्यांनी शुक्रवार दि.१७ ऑक्टोंबर रोजी पदभार घेतला आहे,त्यावेळी त्यांचे स्वागत संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार श्री.दशरथजी वडतिले,सौ.प्रितीताई उडानशिव तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे पी.ए.श्री.संतोषजी गायकवाड,उपप्राचार्य श्री.एस.एस.झणझणे, वरिष्ठ गटनिदेशक श्री.सिद्रामजी गोलेकर,संघटनेचे पदाधिकारी,शिक्षक कर्मचारी आदींनी श्री.बिडकर यांचे स्वागत करून त्यांना हार्दिक शुभेछ्या दिल्या. श्री. बिडकर हे कल्याण येथून बदलून आले



आहेत.विद्यमान प्राचार्य श्री.सुरेशजी भालचीम यांची पुणे येथे बदली झाली आहे. श्री.भालचीम यांनी अनेक पदभार सांभाळत वर्षभरात भरीव कामगिरी केली असून,त्यांनी संस्थेचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे.त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व बिडकर यांचे हार्दिक स्वागत, शुभेच्छा. श्री.बिडकर यांचा थोडक्यात परिचय असा:नाव-मनोज मधुकर बिडकर

पद-प्राचार्य गट अ (क) तांत्रिक.गाव-सोलापूर .शिक्षण-यंत्र अभियांत्रिकी पदविका ( Diploma in Mechanical Engineering), B. E production (अभियांत्रिकी पदवी), Bachelor of Journalism (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ), ME(design) Mechanical औ.प्र.संस्था सोलापूर व पंढरपूर येथे गणित निदेशक या पदावर कार्य केले.२०१६ मध्ये चझडउ मार्फतप्राचार्य गट ब साठी निवड. २०१७-२० नागपूर विभागात सेवा.तदनंतर बढतीने गट अ(क)या पदावर.२०२२-२५ ला कोकण विभागात सेवा केली.

# गुरुजींकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, खाऊचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील सुपतगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक मल्लिनाथ सोळशे यांची दुसऱ्या शाळेत बदली झाल्याने, शाळेत त्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. या भावनिक प्रसंगी एम. एस. सोळशे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना आठवण म्हणून शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप केले.तसेच शाळेसाठी थंड पाणी ठेवण्यासाठी जार भेट दिले.

सोळशे यांनी सुपतगाव प्राथमिक शाळेत पाच वर्ष अध्यापनाचे कार्य केले. त्यांच्या विद्यार्थ्यांवरील प्रेमामुळे आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळे ते विद्यार्थी व पालकवर्गात लोकप्रिय होते. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल मुख्याध्यापक जी. एम. कबाडे यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.



बदली झाल्यामुळे शाळेतून निरोप घेताना सोळशे यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय उपयोगी पॅड भेट दिले. तसेच या आनंदी-दुःखाच्या क्षणी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

याप्रसंगी बोलताना शिक्षक शाळेतील आपल्या कारकिर्दीतील अनुभव सांगितले. ते म्हणाले, या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवताना मला खूप आनंद मिळाला. ही मुले माझ्यासाठी नेहमी खास राहतील.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी त्यांच्या लाडक्या शिक्षकाला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा निरोप समारंभ शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील स्नेहबंध अधोरेखित करणारा ठरला.

या कार्यक्रम साठी शाळेतील शिक्षक व्यकट क्षीरसागर, राजेश सूर्यवंशी, चिदानंद स्वामी, शालेय समितीचे सर्व पदाधिकारी, दत्तात्रय गिरी, सुरेश लामजणे, ज्ञानेश्वर गुरव, आप्पाराव मुळे,रतन लामजणे, सुधकर हेंडले, शिक्षिका पावशेरे, कुलकर्णी, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी पालक उपस्थित होते.

**अनेक उमेदवारांचे जनसंपर्क तर काही उमेदवारांचे सोशल मिडिया वर पोस्ट**

# किंनगाव राजा जिल्हा परिषद सर्कलमध्ये चुरसीची लढत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मिनी आमदारकी समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी साठी १३आक्टोंबर रोजी आरक्षण जाहीर झाले आहे. इच्छुकांनी आता कंबर कसली आहे. अनेकांनी तयारी सुरु केली आहे.

सिंदखेडराजा तालुक्यातील विशेष महत्वाचे असलेले किनगाव राजा जिल्हा परिषद गटात इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे येथे काटेकी टक्टर पाह्यला मिळणार आहे. या आधी येथून भाजपाचा उमेदवार निवडून गेलेला आहे. परंतु ती परिस्थिती सध्या राहिलेली नाही. सध्या परिस्थिती बदलली असून येणारी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ही भाजपा . राष्ट्रवादी शरद पवार गट. राष्ट्रवादी अजित पवार गट शिंदे शिव सेना. उबाठा.शिवसेना.गट.कॉंग्रेस . वंचित बहूजन आघाडी व अन्य पक्षासाठी अतिशय प्रतिषठेची असणार आहे.

किनगाव राजा जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाला आहे. व त्यात असलेला वाघाळा पंचायत समिती गणात . अनेक उमेदवारांनी लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे. परंतु वरिष्ठ नेते जातीय राजकारण जुळवून उमेदवार देणार आहेत. किनगाव राजा जिल्हा परिषद सर्कलमध्ये किनगाव राजा. हिवरखेड पुर्णा.निमगाव वायाळ. तढेगाव केशव शिवनी.वाकद जहागिर. बारलिंगा. पोफळ शिवनी. डोरव्हि हिवरागडलींग हनवतखेड दरेगाव नागझरी वर्दडी बु.विझोरा वांगजई.शेलगाव राऊत . पिंपळगाव लेंडी.उमरद पळसखेड चक्का. उगला पिपळखुटा वाघाळा जळगाव साठेगाव राहेरी खू.या गावातील ग्रामिण भागातील माणसात उज्वल प्रतिमा असणाऱ्या उमेदवार देण्याचा वरिष्ठाचा विचार असेल. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार.मनोज कायंदे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तथा महाविकास आघाडीचे नेते माजी मंत्री मां.आमदार डॉ राजेंद्र शिंगणे. शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार डॉ शेशिकांत खेडेकर. भाजपाचे माजी आमदार तोतारामजी कायंदे सर्व वरील पक्षाचे वरिष्ठ नेते निर्णय काय घेतील येणारा काळचं उमेदवार ठरवणार आहे. किनगाव राजा जिल्हा परिषद गणयात पंचायत समिती वाघाळा गण हा सर्वसाधारण व्यक्ती म्हणजेच खुला झालेला आहे. त्यामुळे या गणातून अनेकजण इच्छुक असणार आहे. येथून देखील अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे.

किनगाव राजा जिल्हा परिषद गण व वाघाळा पंचायत गण सर्वसाधारण आरक्षित झाल्याने या सर्कलमध्ये मध्ये अनेक इच्छुक उमेदवारांची गर्दी पाहायला मिळत आहे.सोंशल मिडिया.व गावपातळीवर जन संपर्क करत असणाऱ्यांना उमेदवारी मिळते का. व वरीष्ठ नेत्यांच्या डोक्यात दुसऱ्याच उमेदवार शोधणे सुरू आहे बघणं महत्वाचे ठरणार आहे. तर तथा महाविकास आघाडी एकत्र लढून एक च उमेदवार देण्याच्या तयारीत दिसत आहे. महायुती एकत्र उमेदवार लढवतील असे संकेत दिसत नाही. देखील आप आपल्या पक्षाची योग्य उमेदवार शोधण्याची जोरदार तयारी सुरु आहे. योग्य उमेदवार देण्यासाठी सर्वच पक्ष आपल्या कार्यकर्त्यांची चाचपणी करत आहे. अनेक इच्छुक उमेदवार असल्याने. ही निवडणूक प्रतिष्ट्येची ठरणार आहे.

किनगाव राजा जिल्हा परिषद सर्कलमधील इच्छुक उमेदवार.

विनोद वाघ हे भाजपाचे प्रवक्ते आहेत.डॉं सुनील कायंदे हे भाजपाचे ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत.प्रभाकर कायंदे भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पक्ष संघटनेत काम करतात.महाविकास आघाडी तर्फे . किनगाव राजा सर्कलमध्ये अरुण वाघ. विजयी झाले होते. दरेगाव पंचायत समिती गणातून विनायक राठोड विजयी झाले होते . अवघ्या २५व्या वर्षी सभापती पद भुषविले आहे . ह्याच जोडीची पुन्हा सोबत लढण्याचा योग येण्याचे संकेत



दिसत आहे.लोकजागर परीवाराचे विश्वस्त प्रविण गिते यांची उमेदवारी निश्चित आहे पण कोणत्या पक्षाचे टीकीटावर लढवणार हे अद्याप निश्चित झाले नाही.

वाघाळा पंचायत समिती गणासाठी .भाजपा कडून दिपक घुगे. सुनील काळुसे.शिंदे शिवसेना




गटाकडून अविदास बंगाळे. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून समाधान काकड उमेदवारी साठी इच्छुक. रवि मांन्टे दरेगाव येथे सरपंच पदासाठी थेट जनतेतून पंधरासे ते सोळासे मतांनी निवडून आलेले आहेत. आमदार कायंदे यांनी टीकीट दिल्यास निवडणूक लढु शकतात.व अनेक उमेदवार आमदार मनोज कायंदे यांच्याकडे उमेदवारी मिळवण्यासाठी संपर्कात आहेत.राष्टवादी शरद पवार गटाकडून मांजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे योग्य वेळी कोणता उमेदवार देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.रासप कडून अतूल भुसारी पाटील यांची उमेदवारी निश्चित झाल्यासारखीच आहे.का पक्षाचे वरिष्ठ नेते योग्य वेळी जातीय समीकरणे जूळवून उमेदवार देतात का याकडे लक्ष वेधले आहे.

# अक्कलकोट तालुक्यातील एसटी गाड्या बंद करून पुण्याला पाठविले

## अक्कलकोट तालुक्यातील जनता सणासुदीच्या काळात अडचणीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ विशेष प्रतिनिधी

अक्कलकोट तालुक्यातील एस टी गाड्या बंद करून जादा पुणे मुंबई सोडण्यात आल्या आहेत. हा प्रताप

### विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांचा प्रताप

सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी केला आहे यामुळे अक्कलकोट तालुक्यातील जनता प्रचंड संतापली असून आम्ही तिकीटासाठी दगडाचे पैसे देतो काय? आणि पुणे मुंबई चे लोक सोन्याचे पैसे देतात काय? असा सवाल उपस्थित करत याबाबत ची तक्रार अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या कडे केली आहेत.

अक्कलकोट तालुक्यातील जनता सणासुदीच्या काळात बाजारहाट करण्यासाठी खरेदी विक्री करण्यासाठी अक्कलकोट या तालुक्याच्या ठिकाणी येते परंतु अक्कलकोट तालुक्यातील गावागावात जाणाऱ्या एस टी बस रद्द करुन त्या जादा पुणे मुंबई येथे पाठविण्यास आल्या आहेत यामुळे अक्कलकोट तालुक्यातील जेन्स ऐन सणासुदीच्या काळात अडचणीत आली असून लोकांचे मोठे हाल एस टी गाड्या बंद करण्यात आल्या मुळे होत आहेत.

अक्कलकोट बस स्थानकात पवन हनगल हे प्रमुख अधिकारी असून त्यांनी विभाग नियंत्रक यांना अक्कलकोट तालुक्यात एस टी बस सोडाव्या लागतात एस टी बस अक्कलकोट तालुक्यात सोडणे ह गरजेचे आहे. हे नीट समजावून सांगितले नाही त्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील एस टी बस ऐन सणासुदीच्या काळात बंद करून जादा गाड्या पुण्याला




सोडण्यात आल्या आहेत यास सर्वस्वी पवन हनगल आणि अक्कलकोट बस स्थानकावर कार्यरत असलेले जवळपास १० ते १५ कंट्रोलर कारणीभूत असल्याचे प्रवाशी वर्गाचे म्हणणे आहे. जर पुण्याला जाण्यासाठी जादा बस सोडायचेच होते तर अतिरिक्त एसटी बस विभागीय कार्य शाळेमधून मागवून घेवून त्या जादा बस म्हणून पुणे मुंबई येथे सोडल्या असत्या तर अक्कलकोट तालुक्यात जाणाऱ्या एस टी बस बंद करण्याची वेळ आली नसती. यातील जे दोषी स्थानक प्रमुख आणि विभाग नियंत्रक आहेत त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी अक्कलकोट तालुक्यातील जनते मधून आणि प्रवाशांनी केली आहे.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांच्या माध्यमातून प्रभावीपणे रुग्ण सेवा द्यावी : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सामान्य माणसाला विना विलंब आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी राज्य शासनाने सर्व ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू केला आहे. या दवाखान्यांच्या ठिकाणी रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात, असे सांगत राज्यातील सर्व आपला दवाखाना केंद्रांचा सविस्तर आढावा पुढील १५ दिवसात घेतला जाईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा व अन्य अनुषंगिक बाबींचा आढावा सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी आरोग्य भवन येथे आयोजित बैठकीत घेतला. यावेळी नागरी आरोग्य अभियानाच्या सहाय्यक संचालक दिप्ती देशमुख यांच्यासह संबधित



अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, राज्यात मंजुरी देण्यात आलेल्या सर्व ठिकाणी आपला दवाखाना सुरू झाले पाहिजेत. तसेच आपला दवाखान्यांच्या ठिकाणी देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी याची सर्वदूर जनजागृती करण्यावर भर देण्यात यावा. विशेषतः समाज माध्यमे, एफएम रेडिओ यावर जनजागृतीसाठी भर द्यावा.

सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, आपला दवाखान्यांच्या नियुक्त डॉक्टर्ससह अन्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करावे. यासाठी आतापासूनच त्याचे सूक्ष्म नियोजन करून प्रशिक्षणाचा कालबद्ध कार्यक्रम आखावा. आपला दवाखाना सुरू असलेल्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नियमित भेटी द्याव्यात. या ठिकाणी रुग्ण संख्या वाढली पाहिजे, यासाठीही प्रयत्न करावेत. आपला दवाखाना येथे आवश्यक सुविधासह अत्यावश्यक औषध साठाही उपलब्ध करून द्यावे.

आपल्या दवाखान्यात तपासणी केलेल्या रुग्णांची माहिती वरिष्ठ कार्यालयास अचूक देण्यात यावी. चुकीची माहिती देणाऱ्यांवर योग्य कारवाई केली जाईल. आपल्या दवाखाना मध्ये काम करणाऱ्या डॉक्टरांना त्यांचे मानधन वेळेत देण्यात यावे, अशा सूचना मंत्री श्री. आबिटकर यांनी केल्या.

# सोलापूर जिल्हा प्रमुख संभाजी राजे शिंदे यांची पक्षप्रमुख उद्धव ठाकरें साहेब यांची भेट व दिपवाळीच्या शुभेच्छा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

आज शुक्रवार अश्विनी कृ. अकरा दिनांक १७ नंबर २०२५ रोजी आरामात एकादशी व वसुबारस रोजी मुंबई मातोश्री येथे मा. शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा प्रमुखांची बैठक संपन्न झाली यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने दीपावलीच्या शुभेच्छा उमा शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धवजी



बाळासाहेब ठाकरे साहेबांचा सत्कार श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य व शिवसेना सोलापूर जिल्हा पंढरपूर विभागीय पंढरपूर व पंचायत समितीचे सदस्य व शिवसेना जिल्हाप्रमुख पंढरपूर विभाग पंढरपूर पंचायत समिती सदस्य श्री संभाजी राजे शिंदे यांचे तर्फे श्री ची प्रतिमा उपरणे व आहार व दैनंदिनी देऊन करण्यात आला यावेळी शिवसेना नेते श्री चंद्रकांत खैरे, शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख श्री अनिल भाऊ कोकीळ, सोलापूर जिल्हा प्रमुख माढा विभाग श्री धनंजय डिगोळे व मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी घेतलेली छायाचित्र.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांचा पर्यावरणपूरक दीपावलीचा संकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : दीपावली हा दिव्याचा सण आहे, फटाके फोडल्याने प्रदूषण होते, आग लागणे, भाजणे, डोळे निकामी होणे तसेच फुफुसाचे आजार होतात म्हणून पर्यावरण पूरक दीपावलीचा सण साजरा करण्याचा संकल्प विद्यार्थी व शिक्षकांनी केला.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पर्यावरण जनजागृती विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक दिवाळी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे, मधुबाला लोणारी, विद्या बिराजदार, विद्याश्री वाले, सोनाली कटकधोंड, हर्षदा गायकवाड, मनीषा शिंदे, जनाबाई चौधरी, प्रा सौरभ भस्मे व ओंकार घिवारे उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी शिक्षक व विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक दिपावली साजरी करण्याची तसेच जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकरी व नागरिकांच्या कुटुंबीयांना मदत करण्याची शपथ घेतली.

### पूरग्रस्तांना विद्यार्थी व शिक्षकांकडून दीपावली सणानिमित्त मदत

**अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांचे अतोनात नुकसान झाले आहे म्हणून छान छान कपडे फटाके मिठाई घेण्यापेक्षा नागरिक व शेतकऱ्यांना मदत करणार असा संकल्प महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केला तर विनाअनुदानित महाविद्यालय असून देखील शिक्षकांनी एक दिवसाचे वेतन पूरग्रस्तांसाठी दिले त्याबद्दल आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.**

उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी विशेष कौतुक केले.

# पंढरपूर नगरपरिषद मधील बंद पडलेल्या धुळ मशीनचे पूजन, महर्षी वाल्मिकी संघाचे अनोखे आंदोलन...!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/शहर प्रतिनिधी : पंढरपूर शहरामध्ये रस्त्यावरती पडलेल्या खड्ड्यांमुळे व रस्त्याच्या दुरावस्त्यामुळे वाहनांच्या वरदळीने रस्त्यावरील धूळ मोठ्या प्रमाणात हवेत उडते. या धुळीमुळे लहान बालके, महिला, ज्येष्ठ नागरिक व युवकांमध्ये श्वसनाचे आजार, खोकला, सर्दी अशा प्रकारे आजार वाढत आहेत.

तरी नगरपालिका प्रशासन कुठलीही कारवाई करताना दिसत नाही त्यामुळे आज आम्ही महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने पंढरपूर नगरपरिषद यांच्या बंद पडलेल्या धूळ मशीनचे पूजन करून आंदोलन केले हे आंदोलन झोपलेल्या नगरपालिका प्रशासनाला सद्बुद्धी देण्यासाठी करण्यात आले, अशी माहिती यावेळी महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिली.

सहा ते सात वर्षांपूर्वी पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर यांनी लाखो रुपये खर्चून पंढरपूर शहर धूळ मुक्त करण्यासाठी स्वीपर मशीन खरेदी केले ते मशीन बंद पडलेली आहे, तरीही प्रशासनाचा भोंगळ कारभार असून आज पंढरपूर मध्ये वाढत्या धुळीमुळे नागरिक त्रस्त आहेत. या धुळीमुळे नागरिकांमध्ये श्वसनाचे आजार होत असून नाका तोंडात धुळ जात आहे व काही नागरिकांच्या छातीमध्ये व अन्ननलिकेमध्ये धूळ जाऊन चिखल तयार झालेल्या घटना घडताना दिसून येत आहेत.

त्यावरती प्रशासन उपायोजना करताना दिसत नाही त्यामुळे आम्ही गांधीगिरी स्टाईलने आंदोलन केले आहे. असे यावेळी गणेश अंकुशराव यांनी सांगितले आहे.

यावेळी बबलू बोराळकर, सुरज कांबळे, जयवंत अभंगराव, सुनील भाळवणकर, ओमकार परचंडे, आश्विन बुरले, नितीन म्हेत्रे, अण्णा अधटराव, आप्पा करकमकर, अक्षय म्हेत्रे, हनुमंत कोरे, स्वप्निल मोरे, माऊली कोळी, वैभव कांबळे, कृष्णा माने आदी उपस्थित होत.

## तीन जिल्ह्यांचे डेस्टिनेशन मॅनेजमेंट ऑर्गनाझेशन निर्माण करणार - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

# राज्यातील ५०० मंदिरे, ६० राज्य संरक्षित किल्ले आणि १८०० बारवा यांच्या संवर्धनासाठी बृहत आराखडा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी राज्य शासनाकडून मोठा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील ५०० मंदिरे, ६० राज्य संरक्षित किल्ले आणि १८०० बारवा (जलस्रोत) यांच्या संवर्धनासाठी बृहत आराखडा तयार करण्याच्या सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी दिल्या आहेत. या बृहत आराखड्यामध्ये त्यांचे जतन, संवर्धन आणि यापुढे पर्यटक, फुटफॉल वाढवणे याचा समावेश असेल मैत्रीच्या सोबतीने पुरातत्व विभाग यांमध्ये नोडल एजन्सी म्हणून काम करेल, अशा पद्धतीचा निर्णय आज घेण्यात आला. शिवाय पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतील ऐतहासिक स्थळे, मंदिरे, गडकिल्ले यांचा स्वतंत्र एकात्मिक बृहत आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील मंदिरे, किल्ले आणि ऐतिहासिक वस्तू संवर्धनाविषयी मंत्रालयात मंत्री ड. आशिष शेलार यांनी बैठक घेतली. बैठकीला मैत्रीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सांस्कृतिक कला संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे, पु. ल. देशपांडे कला अकदामीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आपल्या महाराष्ट्राला समृद्ध वारसा लाभला आहे. महाराष्ट्राचा इतिहास, ऐतिहासिक मूल्य असलेल्या वास्तू, मंदिरे, गड-किल्ले, बारव हा आपला अभिमान आहे. त्यामुळे जतन संवर्धनाबाबत योग्य नियोजनासाठी बृहत आराखड्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने ही बैठक घेण्यात आली. त्यामुळे या आराखड्यात राज्य संरक्षित वारसा स्थळांबरोबरच राज्य संरक्षित नसलेल्या ३५० किल्ल्यांचा देखील समावेश करण्यात यावा. आराखड्यानंतर प्रत्यक्ष संवर्धनाच्या कामांसाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, तसेच खासगी भागीदारी विचारात घ्यावी. गरज असल्यास खासगी भागीदारीसाठी स्वतंत्र धोरणही तयार करण्यात यावे, अशा सूचना मंत्री ड.शेलार यांनी यावेळी केल्या.

आराखडा तयार करताना इतिहास, वास्तुशास्त्र, पुरातत्त्व, संवर्धन आणि व्यवस्थापन या क्षेत्रातील तज्ज्ञांची नेमणूक करून प्रकल्पाची अंमलबजावणी सुसंगत आणि गुणवत्तापूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पीआययू) यामध्ये चार नवीन अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती जाहिरात करून करणे, १५ डिसेंबरच्या अगोदर या पद्धतीच्या समितीच्या स्थापन करण्याचा निर्णयसुद्धा आज घेण्यात आला.

तीन जिल्ह्यांचे डेस्टिनेशन मॅनेजमेंट ऑर्गनायझेशन निर्माण करणार

पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यातील ऐतिहासिक वस्तू संवर्धन आणि सांस्कृतिक प्रसिद्धी साठी डेस्टिनेशन मॅनेजमेंट ऑर्गनायझेशन निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून या जिल्ह्यांतील ऐतहासिक स्थळे, मंदिरे, गडकिल्ले यांचा एकात्मिक बृहत् आराखडा स्वतंत्रपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला ज्यामध्ये या वास्तूंचे जतन, संवर्धन, देखभाल आणि पर्यटन वाढविणे याचा समावेश असेल. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी संपूर्णतः चर्चा करून पुरातत्व विभाग नोडल एजन्सी आणि मित्राच्या मदतीने या विषयाचा एकात्मिक बृहत् आराखडा बनवण्याचे नियोजनाचे निर्देश मंत्री ड. शेलार यांनी दिले.

पुढील दोन वर्षांमध्ये हे दोन्ही आराखडे एकदा तयार झाल्यानंतर अस्तित्वात असलेले जे आपले पीपीपी धोरण आहे, शासकीय निधी आहे आणि आवश्यकता असेल तर वर्ल्ड बँक आणि एडीबीच्या निधीतून निधी उभारणी कशी करायची, त्याबद्दलसुद्धा मित्रा राज्य शासनाला, आणि पुरातत्व विभागाला मदत करणार आहे. त्यासाठी हा आराखडा आणि बृहत आराखडा होणे आवश्यक असून नियोजन झालं तरच खासगी निधी किंवा शासकीय निधी किंवा वर्ल्ड बँकचा निधी येऊ शकतो.

हा निधी कसा उभा राहू शकतो याबातचा रोड मॅप येत्या दोन वर्षात आराखडे तयार करीत असतानाच करा, अशा सूचना या बैठकीत मंत्री ड.शेलार यांनी दिल्या.

या दोन वर्षांत आराखडा तयार होत असतनाच पहिल्या टप्प्यात ज्या ज्या ठिकाणचा बृहत आराखडा तयार होईल, त्याबाबत पर्यटन विभागाशी चर्चा करून मार्चपर्यंत पहिल्या १५ मध्ये पाच बारव, पाच मंदिरे आणि पाच किल्ले याचे डेस्टिनेशन मॅनेजमेंट करुन त्या कामांना सुद्धा निधी उभारणीला सुरूवात करा अशा सूचना मंत्री ड. शेलार यांनी दिल्या.

राज्य सरकार, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व विभाग, मित्रा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये एक हा बृहत आराखडा आणि एकात्मिक आराखडा करून, यापुढे त्या आराखड्यावर निधी उभारणं या सगळ्यांपर्यंतचा रोडमॅप या दोन वर्षांत पूर्ण करण्याचे हे नियोजन आम्ही करीत असून ११ गडकिल्ले आपले महाराष्ट्रातले आणि एक तामिळनाडूमधला हे आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गडकिल्ले युनेस्कोत गेल्यानंतर, त्याला जागतिक वारसा मिळाल्यानंतर, पूर्ण राज्याचा असा एक मोठा आराखडा बनवण्याचं एक ठोस पाऊल आजपासून आपण सुरू करतो आहोत, असे मंत्री ड. शेलार यांनी सांगितले. या कामात सर्व नागरिकांना, सर्व पर्यटनप्रेमींना, सर्व किल्ले आणि गड याच्या संवर्धनासाठी मदत करणाऱ्या सर्व संस्था, यांचंही मार्गदर्शन व मदत करावी असे अवाहन त्यांनी केले.